


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे  अंक : २४ वा  शुक्रवार  दि. २१  फेब्रुवारी २०२५  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये

# महाराष्ट्र चक्रावेल असा घोटाळा, बदल्यांचे रेटकार्ड, ३०० कोटींचा भ्रष्टाचार

## सुरेश धसांनी धनंजय मुंडेंचा सगळंच काढलं...

**वृत्तसंस्था/बीड**

सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर खून खटल्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी हे मंत्री धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय असल्याचा आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. दुसरीकडे भ्रष्टाचाराच्या आरोपावरूनही धनंजय मुंडें अडचणीत आले असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना कृषी खात्यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप सातत्याने करत आहेत. त्यानंतर, आता आष्टीचे आमदार सुरेश धस ( ) यांनीही मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच, धनंजय मुंडेंचा राजीनामा घेण्याचा सर्वस्वी अधिकार हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाच आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री असताना त्यांनी स्वत: राजीनामा दिला होता, सिंचन घोटाळ्याचे आरोप झाल्यानंतर आम्ही स्वत: पाहिलंय की अजित पवारांनी राजीनामा दिला होता. मग, धनंजय मुंडे का देत नाहीत, असा सवालही आमदार धस यांनी उपस्थित केला आहे. मंत्री धनंजय मुंडेंची भेट घेतल्यामुळे टीकेचे धनी झालेल्या आमदार सुरेश धस यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन वाल्मिक कराड आणि मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. धनंजय मुंडेंच्या वरदहस्ताने कृषी खात्यात ३०० कोटींचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप केले आहेत. शेतकऱ्यांची तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांची कोणतीही मागणी नसताना खरेदी करण्याचा निर्णय घेतला. एकाच दिवशी प्रस्ताव पाठवला आणि त्याच दिवशी जीआर निघाला. हे सर्व डीबीटीने द्यावे असे तत्कालीन सनदी अधिकारी प्रवीण गेडाम यांनी सूचवले होते. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उपसचिव संतोष कराड यांनी नॅनो युरिया, नॅनो डीएपी आणि गोगलगाय प्रादुर्भाव रोखण्यासाठी अग्रिम देण्यात यावा असे आदेश काढल्याची माहिती आमदार धस यांनी दिली. धनंजय मुंडे यांनी आज अर्ज उद्या कर्ज अशा स्वरुपात सर्व करुन ठेवले, टेंडर काढताना अतिशय डोक्याने ते काढले आहे. कुणाला काही कळू नये असे टेंडर काढण्यात आले, महाराष्ट्राचे डोके चक्रावेल असं सर्व आहे, असे आमदार धस यांनी म्हटलं आहे. नॅनो युरियामध्ये २१ कोटी २६ लाखांचा भ्रष्टाचार झाला आहे, मध्ये ५६ कोटी ७६ लाख रुपये, बॅटरी ४५ कोटी ५३ लाख, कापूस साठवणूक बॅगमध्ये ५७७ ची बॅग १२५० रुपये घेण्यात आली. तर, १८० कोटी ८३ लाख रुपये धनंजय मुंडे आणि त्यांच्या चमूने बाहेर काढल्याचा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे. रफिक नाईकवाडे यातील मुख्य अ‍ॅक्टर आहे, भामरे आजही त्यांच्यासोबत आहेत. या चमूने फक्त कागदपत्रे रंगवली आहेत, लोकायुक्त कार्यालयाल देखील खोटी माहिती देण्यात आली. त्यामुळे, धनंजय मुंडे यांच्या काळातील या भ्रष्टाचाराची स्थापन करून चौकशी करा, अशी मागणीही आमदार सुरेश धस यांनी केली आहे. भारतीय किसान संघाने देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले होते, संबंधित घोटाळ्याची तपासून कारवाई करावी. मात्र, वाल्मिक कराड यांनी हे पत्र फाडून टाकले होते. कृषी विभागाला चॅलेंज करतो हे पत्र तुमच्याकडे आहे का? असंही धस यांनी म्हटलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच याचे उत्तर द्यावे. भारतीय किसान सभेचे पत्र त्यांनी फाडून टाकले. त्यामुळे, त्यांची नार्को टेस्ट करावी अशी मागणी आमदार धस यांनी केली आहे. तसेच, , , यांच्याकडे याबाबतची सविस्तर तक्रार करणार आहे, धनंजय मुंडे यांनी केलेल्या बदल्यांमध्ये १०० कोटींचा भ्रष्टाचार केला आहे. बदल्यांसाठीचे रेट कार्ड त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांकडे सापडले आहे,



धनंजय मुंडे यांच्याकडे सर्व वाटा जात होता, असा गंभीर दावा आमदार धस यांनी केला आहे. वाल्मिक कराड यांनी निविदा ठरवल्या, वाल्मिक कराड हे राज्याचे बाप होते का? महाराष्ट्रात ठराविक एजंटची नेमणूक केली होती. या सर्वांचे काढा, १०० कोटींपेक्षा अधिकचा भ्रष्टाचार यात आहे. वाल्मिक कराड जिल्ह्याचे बाप वाटत होते, मात्र निविदा काढण्यात देखील तो बाप होता असा टोला सुरेश धस यांनी लगावला आहे. आकाचे कार्य फक्त बीड जिल्हा पुरते नव्हते, संपूर्ण महाराष्ट्रभर होते, आता कागदाचा लढा चालू द्या, आता खटला करा पण मी माघार घेणार नाही. हा सगळा एकूण ३०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. धनंजय मुंडे म्हणतात अंजली दमानिया यांच्यावर अब्रु नुकसानीचा दावा करणार, पण मी म्हणतो त्यांनी माझ्यावर खटला दाखल करावा, असे म्हणत सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडेंना चॅलेंजच दिलं आहे.

---

# दोन गटांमध्ये वाद, तलवार-फायटरने हल्ला!...

**जनसंचलन/मलकापूर**

मिरवणुकीदरम्यान दोन गटांमध्ये वाद विकोपाला जाऊन तलवार आणि फायटरने हल्ला करण्यात आला. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण झाल्याची घटना १९ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १९ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास मिरवणुकीत मंडळ पुढे नेण्याच्या वादातून हाणामारी झाली. ही घटना बुलढाणा रस्त्यावरील ज्वेलर्ससमोर घडली. यामुळे संपूर्ण उत्सव सोहळ्यात गोंधळ उडाला होता. या प्रकरणात मलकापूर येथील हॉटेल व्यावसायिक मयूर अभिमान हुंबे यांनी शहर पोलिसांत फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी तलवार आणि फायटरने हल्ला करून त्यांना मारहाण केली. तसेच २ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावली. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी धनराज राजपूत, अतुलसिंह राजपूत (रा. यशोधाम), पवन राजपूत आणि ओम राजपूत अशा चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला. यातील पवन आणि ओम राजपूत या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक गजानन कौळासे करीत आहेत. दुसऱ्या गटातील पवन गजानन सोळंके राजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिवाजी नगरातील तिघांनी गांधी चौकातील उर्दू शाळेसमोर शिवीगाळ करून फायटरने हल्ला केला. या घटनेप्रकरणी मयूर हुंबे, विनोद काळे आणि राम घुले या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# प.पू.गाडगेबाबा: एक थोर समाज सुधारक!

## संपादकीय लेख

संतशिरोमणी गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे, ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण ज्ञानवर्धक संकलित माहितीचा संत चरणधूळ: बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा सदर लेख चोखंदळ वाचकांच्या सेवेत... संपादक.

गाडगे महाराजांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील ता.दर्यापूर, शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी- मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी करायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे. सन १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता, दिलेली बगल होती. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी एकवटून केली पाहिजेत, हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे; हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. ङ्ङ्मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा- प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे, असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश- गाडगेबाबा प्रबोधन काव्य- भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गोरगरीब मुलामुलींना = शिक्षण, शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू, रोगी यांना = औषधोपचार, बेकार-बेरोजगारांना = रोजगार, पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत हा मानवधर्म पाया आहे.

त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब



जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे- या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ, असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिंसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. ङ्गोपाला गोपाला देवकीनंदन गोपालाफ या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिले आहे. गाडगेबांच्या शिकवणीप्रमाणे आजचा खरा रोकडा धर्म आहे! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !! !! थोर समाजसुधारक संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांना जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

# परिचारिकांचा शासनास कामबंद चा झटका

## राज्यव्यापी कामबंदमुळे जिल्ह्यातील आरोग्यसेवा प्रभावित

**जनसंचलन/बुलढाणा**

१८ वर्षांपासून प्रलंबित मागण्या व अन्यायकरक धोरणविरोधात परिचारिकांचे राज्यव्यापी एकदिवासीय कामबंद आंदोलनामध्ये संघटनेची जिल्हा शाखा महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशन बुलढाणा यांनीही आज सकाळी सात वाजून ३० मिनिटांपासून काम बंद आंदोलन पुकारल्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य संस्थामधील रुग्णसेवा प्रभावित झाली असून जिल्हाभरातील परिचारिकांनी अचानक आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे प्रशासनाचे सुद्धा नियोजन कोलमडलेले आहे

अठरा वर्षाच्या दीर्घ कालावधीपासून आमच्या प्रलंबित मागण्यासाठी व शासनाच्या दुर्लक्षपणामुळे आम्हाला नाईलाजाने कामबंद आंदोलनामध्ये सहभागी व्हावे लागत आहे. सदर एक दिवसीय काम बंद आंदोलनाची शासनाने आज संध्याकाळपर्यंत दखल न घेतल्यास संपूर्ण राज्यभरातील परिचारिका अधिक आक्रमक करून बेमुदत संपावर जातील असा इसार इशाराही शासनास संघटनेच्या राज्य शाखेने दिला आहे... अशी माहिती महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशन बुलढाणा च्या जिल्हाध्यक्ष श्रीमती जयश्री वाघ यांनी दिली आहे.




जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, क्षयधाम, सा. रु. खामगाव, ग्रा.रु.चिखली, मोताळा, दे.राजा, सा.रु.शेगाव , मलकापूर, सि. राजा, मेहकर, लोणार सह जिल्हाभरातून कामबंद आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे

# ओबीसी महासंघाचे धरणे आंदोलन

**जनसंचलन/बुलढाणा**

ओबीसी महासंघाच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी २० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. बिहारच्या धर्तीवर राज्यात जातनिहाय सर्वेक्षण करण्यात यावे, ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेची रक्कम त्वरित देण्यात यावी, ओबीसींच्या मुलांना १०० टक्के शिष्यवृत्ती मंजूर करावी, या घटकांमधील सुशिक्षित बेरोजगारांना वैयक्तिक व्याज परतावा कर्ज मर्यादा १५ लाख रुपये करण्यात यावी, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलनात राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा ज्योती ढोकणे, उपाध्यक्ष विजय डवांगे, प्रकाश बिडवे, जिल्हा उपाध्यक्ष राजेश अंबूसकर, सदानंद माळी व अन्य सहभागी झाले होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# फडणवीस सरकारचा मोठा निर्णय, शिवपराक्रमाचा हा दिवस शिवचातुर्य दिन म्हणून होणार साजरा




**वृत्तसंस्था/ आग्रा**

आग्र्याच्या लाल किल्ल्यातील पोलादी सुरक्षा भेदून, छत्रपती शिवाजी महाराजांनी नजर कैदेतून बाल संभाजीसह घेतलेली भरारी, ही रोमांचकारी घटना असून या घटनेचे महत्व लक्षात घेऊन सांस्कृतिक कार्य विभाग तिथीनुसार शिवचातुर्य दिन म्हणुन साजरा करणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी केली. शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आग्रा येथील कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विनोद पाटील, एस पी सिंग बाघेल, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार परिणय फुके, छावा चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारे विकी कौशल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आग्रा येथील लाल किल्ल्यावर सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने शिवजन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र बनवणार असल्याचे यावेळेस नमूद केले ॲड. आशिष शेलार पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी ङ्गपरिंदा भी पर मार नही सकता अशी सुरक्षा यंत्रणा होती, ते सुरक्षा कवच मोठ्या युक्तीने भेदून औरंगजेबाला त्याच्याच इलाख्यात जाऊन मारलेली चपराक म्हणजेच आग्र्याहून सुटका होय! शक्ती-युक्ती आणि चातुर्याची ही घटना संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायक असल्याने, तिथीनुसार हा दिवस महाराष्ट्रात शिवचातुर्य दिन म्हणुन साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी राज्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन, महाराजांची युद्धनीती, गनिमी कावा आणि भक्ती - शक्ती - युक्ती यावर प्रयोगात्मक कलेच्या माध्यमातून तसेच चर्चासत्रे/परिसंवाद/हेरिटेज वॉक माध्यमातून प्रकाश टाकण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा महानाट्याचा विषय असल्याने, त्यांच्या कार्याचे विविध पैलू सांस्कृतिक माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न सांस्कृतिक कार्य विभाग करेल असेही त्यांनी पुढे सांगितले.

# ठाकरेंच्या शिलेदाराचं पत्र, मुख्यमंत्रीकडून चौकशीचे आदेश

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा असताना एक महत्त्वाची घडामोड समोर आलेली आहे. जालन्यातील गृह प्रकल्पाबद्दल सिडकोनं घेतलेल्या यूटर्नची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद असताना सिडकोनं एका प्रकल्पावरुन घूमजाव केलं होतं. हे प्रकरण ९०० कोटी रुपयांचं आहे. जालन्यात ९०० कोटींचा गृह प्रकल्प राबवण्यात येणार होता. आर्थिकदृष्ट्या प्रकल्प तोट्याचा असल्यानं २०२० मध्ये तो रद्द करण्यात आला. पण फेब्रुवारी २०२३ मध्ये शिंदे मुख्यमंत्री असताना आर्थिकदृष्ट्या अडचणीच्या असलेल्या प्रकल्पाला हिरवा कंदिल दाखवण्यात आला. तीन वर्षांत सिडकोनं भूमिका का बदलली, रद्द करण्यात आलेला प्रकल्प पुन्हा का सुरु केला, याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. प्रकल्प सुरु करण्यात आला, त्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते. एकनाथ शिंदेंकडे असणाऱ्या नगरविकास खात्याच्या अखत्यारित सिडको येतं. जालन्यातील खारपुडी गावात ३०१ एकरवर भलंमोठं गृहसंकुल उभारण्याची योजना आखण्यात आली होती.



त्यासाठी २०१९ मध्ये मेसर्स ई अँड वाय यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती केली गेली. तांत्रिक, आर्थिक बाबींचा विचार करता जालन्यातील प्रकल्प व्यवहार्य नसल्याचा अहवाल मेसर्स ई अँड वायनं दिला. या भागातील लोकांची कमी क्रयशक्ती आणि पाण्याचा तुटवडा यांचा उल्लेख अहवालात करण्यात आला होता. सिडकोला सादर करण्यात आलेल्या अहवालावर जानेवारी २०२० मध्ये झालेल्या बोर्ड मीटिंगमध्ये चर्चा झाली. जालन्यातील प्रकल्प अव्यवहार्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सिडकोनं राज्य सरकारला डिनोटिफिकेशन काढण्याची विनंती केली. यानंतर जुलै २०२० मध्ये सिडकोनं प्रकल्प रद्द केला. पण फेब्रुवारी २०२३ मध्ये याच प्रकल्पासाठी राज्य सरकारनं नोटिफिकेशन काढलं. त्यानंतर जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरु करण्यात आली. जालन्यातील बदनापूरचे शिवसेना उबाठाचे माजी आमदार संतोष सांबरे यांनी ही बाब मुख्यमंत्री फडणवीसांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी या महिन्याच्या सुरुवातीला मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. सिडकोनं २०२३ मध्ये घेतलेल्या यूटर्नची चौकश व्हावी. या यूटर्नसाठी एका दुसऱ्या खासगी कंपनीच्या अहवालात फेरफार करण्यात आल्याचं सांबरेंनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलं. जमीन माफिया आणि अधिकाऱ्यांनी हातमिळवणी कलेली. एका खासगी सल्लागारानं दुसऱ्या अहवालात फेरफार केले. त्यामुळे सिडकोवर ९०० कोटी रुपयांच्या अव्यवहार्य प्रकल्पाचा बोजा पडला. आम्ही तिथल्या जमीन मालकांची माहिती तपासली. तेव्हा त्या जमिनी आसपासच्या प्रख्यात उद्योगपतींच्या नावावर असल्याची बाब निदर्शनास आली. उद्योगपतींनी शेतकऱ्यांकडून कवडीमोलानं जमिनी खरेदी केल्या आणि आता ते सिडकोला जमिनी विकून नफा कमावत आहेत. या सगळ्याची चौकशी व्हावी, असं सांबरेंनी पत्रात लिहिलं होतं. या पत्राची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ७ फेब्रुवारीला चौकशीचे आदेश दिले. तशा आशयाचं पत्र सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना देण्यात आलं. त्यांना या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करायचा आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनीदेखील मुख्यमंत्र्यांकडे हा विषय मांडला होता आणि प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली होती.

# एकनाथ शिंदे यांना बॉम्बने उडवण्याची धमकी, मुंबई पोलिसांना ई-मेल, यंत्रणा अलर्टमोडवर

**जनसंचलन/ मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवेमारण्याची धमकी देण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांच्या गाडीला बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा ई-मेल पोलिसांना आल्याने पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. गोरेगाव पोलिसांना एका अज्ञात व्यक्तीकडून अशा धमकीचा ई-मेल पाठवण्यात आला आहे. सध्या पोलीस या अज्ञात व्यक्तीचा शोध लावण्याचा प्रयत्न करत आहेत. गोरेगाव पोलीस स्टेशन, जेजे मार्ग पोलीस स्टेशन आणि मंत्रालयात हे ई-मेल आले आहेत. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गाडीला बॉम्बने उडवून टाकू, अशीधमकी या मेलमध्ये देण्यात आली आहे. सध्यातरी हा कोणीतरी खोडसाळपणा केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पण, सुरक्षेच्या दृष्टीकोणातून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. उपमुख्यमंत्र्यांसंबंधीत हा ई-मेल असल्याने पोलिसांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. हा ई-मेल कुठून आला, कोणी पाठवला याचा शोध पोलीस घेत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या दिल्लीत आहेत. आज दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचा शपथविधी सोहळा पार पडला. या शपथविधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दिल्लीत पोहोचले होते. त्यानंतर एकनाथ शिंदे पुन्हा परत येतील. त्यांना आलेल्या धमकीच्या ई-मेलमुळे सुरक्षा यंत्रणा अलर्टमोडवर आली आहे.



# प्राजक्ता माळी लवकरच अडकणार लग्नबंधनात?

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी सध्या तिच्या आगामी चिकी चिकी बुबूम बुमम या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या सिनेमात प्राजक्तासोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, प्रथमेश शिवलकर, रोहित माने, वनिता खरात यांसारखे अनेक कलाकार झळकणार आहेत. हा सिनेमा २८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाच्या प्रमोशनसाठी प्राजक्ता अनेक माध्यमांना मुलाखत देत आहे. अशातच आता प्राजक्ताने तिच्या लग्नाबद्दल भाष्य केलंय. सुमन म्युझिक मराठीफ या युट्यूब चॅनेलवरील ङ्गआम्ही असं ऐकलंयफ या कार्यक्रमाला प्राजक्ता माळीने हजेरी लावली होती. या कार्यक्रमादरम्यान अभिनेत्रीने ती आता लग्नासाठी तयार असल्याचं सांगत तिने आईला मुलं बघण्याची परवानगी दिल्याचं सांगितलं आहे. इतकंच नव्हे तर, तिला दोन मुलांनी पत्राच्या माध्यमातून लग्नाची मागणी घेतली आहे. त्या दोन पत्रांमधील तिला शेतकरी मुलाचं पत्र आवडल्याचं सांगितलं.



प्राजक्ता माळी म्हणाली की, माझ्यासाठी मुलं शोधण्याकरिता अखेर मी आईला आता परवानगी दिली आहे. ही ब्रेकिंग न्यूज आहे. काही दिवसांपूर्वी मी उडतं उडतं असंच कुठेतरी बोलले होते, तर आईला खरंच दोन पत्र आली आहेत. मला ती पत्र इतकी आवडली आहेत. मला असं वाटतंय त्यांना फोन लावावा. कारण त्यातील एका पत्रामध्ये त्यांनी खूप प्रांजळपणे म्हटलेलं आहे की, मी शेतकरी आहे. मला माहिती आहे हे काहीतरी वेगळ्या पद्धतीने बोलतोय. तुमचं क्षेत्र वेगळं आहे. पण मला हे प्रांजळपणे मांडायचं आहे, मी शेतकरी आहे. मी शेतीचं करणार, तुम्हाला आवडणार असेल तर मला तुमच्याशी लग्न करायचं आहे. प्राजक्ता पुढे म्हणाली की, मला हे पत्र इतकं आवडलं की म्हटलं, हे किती गोड आहे. त्यामुळे मी आता मुलं बघण्यासाठी मनाई केली नाहीये. आधी मी म्हणायचे, तुम्ही डोकेदुखी नका करू. माझ्या डोक्याला ताप देऊ नका. पण, मी आता प्रवाहप्रमाणे जातेय. तुला वाटतंय असं करायचं, आणच शोधून. मी बघते. पण जेव्हा होईल तेव्हा होईल. होईल तरी उत्तम आणि नाही होईल तरी उत्तम.

# महाराष्ट्रासोबत या राज्यानेही ओळखली छत्रपती संभाजी महाराजांची कीर्ती...

**वृत्तसंस्था/मुंबई**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा चित्रपट सध्या थिएटरमध्ये गाजतोय. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांच्या शंभुराजांवर हा सिनेमा आधारीत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या ख्यातीची दखल आता मध्ये प्रदेशानेसुद्धा घेतली आहे. मध्य प्रदेशात हा सिनेमा करमुक्त करण्यात आला आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले की, छावा हा चित्रपट करमुक्त केला जाईल. चित्रपट करमुक्त झाल्यानंतर तिकिटांचे दर कमी होतील,. या चित्रपटात अभिनेता विकी कौशलने मुख्य भूमिका साकारली असून त्याने केलेल्या भूमिकेचे खूप कौतुक होत आहे.



बुधवारी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मी छावा हा चित्रपट करमुक्त करण्याची घोषणा करतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त, त्यांचे पुत्र संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा हा चित्रपट आता मध्य प्रदेशात करमुक्त होणार आहे.

मध्य प्रदेशातही छावा चित्रपटाची क्रेझ भरपूर पाहायला मिळत आहे. चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक चित्रपटगृहात जात आहेत. या चित्रपटाचे सर्वत्र कौतुक होत आहे. चित्रपट करमुक्त झाला असल्याने, आता चित्रपट पाहण्यासाठी गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशात छावा चित्रपट करमुक्त करण्याची मागणी अनेक हिंदू संघटनांनी केली होती. हा चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. सीएम मोहन यादव यांनी इतिहासावर आधारित हा चित्रपट करमुक्त करण्याची घोषणा केली आहे.

सध्या छावा सिनेमाने बॉक्स ऑफिसवर देखील कमाल केली आहे. शिवजयंती निमित्त भरपूर प्रेक्षक थिएटरमध्ये जाऊन हा सिनेमा पाहून आले. त्यामुळे सिनेमा दुप्पट नफा झाला. बुधवार दिनांक १९ फेब्रुवारीला या सिनेमाने पहिल्या दिवसापेक्षा जास्त कमाई केली. या सिनेमाने देशभरात १९७.७५ कोटी कमावले आहेत.

# मी डोळे उघडले तेव्हा शेजारी सुशांत सिंहचा आत्मा बसलेला!

## सुप्रसिद्ध डॉक्टरने शेअर केला अनुभव...

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई- अभिनेता सुशांतसिंह राजपूत याने २०२० मध्ये वांद्रे येथील राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. त्यानंतर या घटनेवर बरेच वादविवाद झाले, तर्क वितर्क काढले गेले मात्र तरीही अद्याप या प्रकरणाचा छडा लागलेला नाही. अजूनही कोर्टात या प्रकरणी केस सुरू आहे. अभिनेता सुशांतसिंह राजपूत हा एक असा अभिनेता होता ज्याचे टीव्ही इंडस्ट्री पासून ते सिनेइंडस्ट्रीपर्यंत चाहते होते. त्याच्या निधनाला आता इतके वर्ष ओलांडली तरीही चाहत्यांच्या मनातली त्याची जागा अजून कोणीही घेतलेली नाही. गेल्या चार वर्षांहून अधिकचा काळ या प्रकरणाचा तपास होत आहे पण अजूनही काहीच हाती लागलेले नाही. याप्रकरणी सुशांतसिंहचे कुटुंबीय अजूनही लढा देत आहेत आणि भावासाठी न्याय मिळावा म्हणून झगडत आहेत. सुशांतची बहिण बऱ्याच मुलाखतींमध्ये म्हणाली होती की तिला अजूनही सुशांतचे वास्तव्य जाणवते. तो आजूबाजूला असल्याचा भास होतो. यावर डॉक्टर मनमीतकुमारने सुद्धा म्हटलेले की सुशांतचा आत्मा अजूनही या जगात आहे. आपल्या यूट्यूब चैनल वर अध्यात्मिक गुरु, सायकिक आणि मिडीयम म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉक्टर मनमीतकुमार यांनी सुशांत सिंह राजपूत शच्या आत्म्यासोबत झालेल्या संवादाबद्दल काही गोष्टी शेअर केल्या. पॉडकास्टमध्ये मनमीत कुमार यांनी सांगितले की गेली दोन वर्ष सुशांत सिंह राजपूत याचा आत्मा त्यांच्याकडे येत आहे. डोळे उघडले तर शेजारी सुशांतसिंहचा आत्मा बसलेला. सुशांत सिंह राजपूत यांच्या आत्म्याशी झालेल्या पहिल्या मुलाखती बद्दल सांगताना त्या म्हणाल्या की, त्या योगा करत होत्या जेव्हा त्यांचा प्राणायाम संपलं तेव्हा त्यांनी डोळे उघडले, त्यावेळेस त्यांच्या जवळच सुशांतचा आत्मा बसलेला. मनमीतने सांगितले की, सुशांतचा आत्मा माझे प्राणायाम संपेपर्यंत शांतपणे वाट पाहत होता. जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा सुरुवातीला मी खूप घाबरले पण नंतर मला समजले की तो सुशांतचा आत्मा आहे. सुशांतच्या आत्म्याच्या भेटीचा किस्सा पुढे शेअर करताना डॉक्टर म्हणाल्या की तो मला सांगत होता माझी कहाणी अजून तू लोकांना का सांगत नाहीस? सुशांत ची इच्छा आहे की कोणीतरी त्याच्यावर पुस्तके लिहावी, कोणीतरी त्याचे सत्य बाहेर आणून त्याच्यावर पुस्तक प्रकाशित करावे.



डॉक्टर मनमीतकुमार यांनी हे सुद्धा कबूल केले की सुशांत अजूनही इथेच आहे, त्याचा आत्मा अजून सुद्धा यात जगातून गेलेला नाही. यामागचे कारण त्याचा रहस्यमय झालेला मृत्यू हेच नसून लोकांचे त्याच्यावरचे प्रेम सुद्धा आहे ज्यामुळे तो अजूनही त्यांच्याशी भावनिक दृष्ट्या जोडला गेलेला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# झेल सुटले, महागात पडले; गचाळ फिल्डींगनं भारताचा घात; बांगलादेशने २०० चा पल्ला केला सहज पार...

**वृत्तसंस्था/ दुबई**

रोहित शर्मा, हार्दिक पंड्या आणि लोकेश राहुल यांचा चुकांचा सर्वात मोठा फटका भारताच्या संघाला बसल्याचे पाहायला मिळाले. भारताने बांगलादेशची ५ बाद ३५ अशी दयनीय अवस्था केली होती. पण या भारताच्या चुकांचा बांगलादेशने चांगलाच फायदा उचलत २२८ धावांचा डोंगर उभारला. टोविड ह्रदोयने यावेळी १०० धावांची खेळी साकारत भारतीय गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. भारताला यावेळी मोहम्मद शमीने दमदार सुरुवात करून दिली. कारण मोहम्मद शमीने पहिल्याच षटकात भारताला विकेट मिळवून देत बोहनी केली. मोहम्मद शमीने सौम्य सरकारने शून्यावर बाद केले. त्यानंतरच्या दुसऱ्या षटकातही भारताने बांगलादेशला अजून एक धक्का दिला. त्यामुळे बांगलादेशची २ षटकांत २ बाद २ अशी अवस्था झाली होती. अक्षर पटेलने यावेळी अचूक गोलंदाजी करत बांगलादेशच्या फलंदाजांना चांगलेच नाचवले. अक्षर पटेलने नवव्या षटकाच्या दुसऱ्याच चेंडूवर तांझिद अहमदला बाद केले, त्यावर अक्षर थांबला नाही, तर अक्षरने त्यानंतरच्याच चेंडूवर मुशफिकर रहिमला बाद केले, त्याला भोपळाही फोडता आला नाही. त्यानंतर अक्षर पटेल हॅट्रीकवर होता. अक्षरने तिसरी विकेट मिळवली असती, पण रोहित शर्माने स्लीपमध्ये झेल सोडला आणि त्यामुळे अक्षरची हॅट्रीक हुकली. रोहित शर्माने झेल सोडल्यावर भारतीय संघात चुकांची स्पर्धाच लागल्याचे पाहायला मिळाले. कारण हार्दिक पंड्यानेही सोपा झेल सोडला. लोकेश राहुलकडून तर यावेळी दोन चुका घडल्या. राहुलने यावेळी एक झेल सोडला होता,




त्यानंतर राहुलने एक स्टम्पिंग सोडली आणि बांगलादेशचा त्याचा चांगलाच फायदा झाला. भारताच्या चुकांचा फायदा यावेळी टोविड ह्रदोय आणि जाकेर अली यांना झाला. बांगलादेशची ५ बाद ३५ अशी अवस्था झाली होती. पण या दोघांनी सहाव्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचली. जाकेर अली यावेळी ६८ धावावर बाद झाला. पण ह्रदोयने मात्र धडाकेबाज फटकेबाजी करत शतक झळकावले आणि संघाला दोनशे धावांचा पल्ला सहजपणे गाठून दिला. भारताला विकेट्स मिळवून देण्याची सुरुवात मोहम्मद शमीने केली. शमीने या सामन्यात पाच विकेट्स मिळवल्या. हर्षित राणाने तीन आणि अक्षर पटेलने यावेळी दोन विकेट्स मिळवल्या.

---

## भारताविरुद्ध जिंकणं अवघडच सामन्याआधीच पाकने टाकली नांगी




**वृत्तसंस्था/ मुंबई**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानला न्यूझीलंडने ६० धावांच्या मोठ्या फरकाने पराभूत केले. या पराभवानंतर यजमान पाकिस्तान विरुद्ध भारत हा सामना करो या मरो असा असेल. मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानला कोणत्याही परिस्थितीत भारताविरुद्ध जिंकावे लागेल. पण पाकिस्तानी संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला हरवू शकणे हे तसे अवघडच दिसते. पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने आता भारत-पाक सामन्याआधीच नांगी टाकलेली दिसत आहे. शोएब अख्तरने इन्स्टाग्रामवर हा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये शोएब अख्तर भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यावर आपले मत मांडत आहे. शोएब अख्तर व्हिडिओमध्ये म्हणत आहे की,आता पाकिस्तानसाठी करा किंवा मरो अशी परिस्थिती आहे. भारतीय संघ खूप मजबूत आहे, त्या भारतीय संघाला हरवणे कठीण वाटते, पण शुभेच्छा पाकिस्तानी संघासोबत आहेत. मला खात्री आहे की पाकिस्तान संघ भारताला हरवण्यात यशस्वी होईल. पाकिस्तान संघाकडे दुसरा पर्याय नाही, पण तुम्ही नक्कीच आक्रमक क्रिकेट खेळू शकता भारत- पाक हा बहुचर्चित सामना हा रविवारी म्हणजे २३ फेब्रुवारी २०२५ रोजी रंगणार आहे. भारत -पाक सामना म्हटला की चर्चा होतेच त्यात पाकसाठी हा सामना खूपच महत्वाचा आहे. भारताचा पहिला सामना आज बांगलादेशविरुद्ध दुबई इंटरनेशनल क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. भारताचा बांगलादेशविरुद्धचा सामना हा या स्पर्धेतील पहिला सामना असणार आहे तर पाकविरुद्धचा सामना हा दुसरा असणार.

## विराट कोहली भर मैदानात लोकेश राहुलवर का भडकला, कोणत्या चुकीचा भारताला बसला फटका...

**जनसंचलन/बुलढाणा**

दुबई : विराट कोहलीचा (सर्वात लाडका खेळाडू हा लोकेश राहुल आहे. पण आता भर मैदानात विराट कोहली राहुलवर भडकल्याचे पाहायला मिळाले. कारण राहुलकडून एक मोठी चूक घडली आणि त्याचा मोठा फटका आता भारतीय संघाला बसल्याचे समोर आले आहे. ही गोष्ट घडली ती २३ व्या षटकात. त्यावेळी रवींद्र जडेजा हा गोलंदाजी करत होता. जडेजाच्या गोलंदाजीचा सामना यावेळी जाकेर अली करत होता. भारताने बांगलादेशची ५ बाद ३५ अशी अवस्था केली होती. त्यानंतर बांगलादेशच्या जाकेर अलीने दमदार फलंदाजी करत संघाचा डाव सावरला होता. त्यामुळे तो भारतासाठी डोकेदुखी ठरत होता. पण जाकेरला बाद करण्याची सुवर्णसंधी भारताकडे चालून आली होती. पण त्याचवेळी लोकेश राहुलकडून एक मोठी चूक घडली. जडेजाच्या २३ व्या षचकाच्या





पहिल्याच चेंडूवर जाकेर अली हा मोठा फटका मारण्यासाठी पुढे सरसावला होता. जाकेर क्रिझसोडून एकढा पुढे आला होता की, त्याला चेंडू मारता आला नाही तर तो बाद होईल, हे स्पष्ट दिसत होते. जडेजाचा चेंडू यावेळी चांगला वळला. या चेंडूने जाकेर अलीला चकवा दिला आणि तो लोकेश राहुलच्या दिशेने गेला. यावेळी सहजपणे चेंडू पकडून जाकेर अलीला यष्टीचीत करता आले असते, पण ही संधी मात्र लोकेश राहुलने गमावली. हा चेंडू पकडण्यासाठी लोकेश राहुलने घाई केली आणि हा चेंडू लोकेश राहुलच्या हातूनही निसटला. त्यामुळे जाकेर अलीला जीवदान मिळाले. ही संधी जेव्हा राहुलने सोडली, तेव्हा विराट कोहली त्याच्यावर चांगलाच भडकलेला पाहायला मिळाला. विराट कोहलीने रागाच्या भरात लोकेश राहुलला अपशब्दही वापरल्याचे पाहायला मिळाले. कारण लोकेश राहुलची ही मोठी चूक होती आणि त्याचा फटका भारतीय संघाला बसला आहे. लोकेश राहुलने यापूर्वी एक झेलही सोडला होता. त्यामुळे लोकेश राहुलची ही दुसरी मोठी चूक होती. त्यामुळे आता लोकेश राहुलच्या यष्टीरक्षणावर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# फुकटात मिळणारा इवलासा कडीपत्ता केसांसाठी जादुई, ७ दिवसांत केसगळती होईल बंद




आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे सर्वच वयोगटातील लोकांना केसगळतीच्या भयंकर समस्येला सामोरं जावं लागत आहे. या दिवसांत घनदाट आणि चमकदार केस मिळवणे हे आव्हानच झाले आहे. प्रदूषण, बदलती लाईफस्टाईल आणि अपूर्ण आहार याचा परिणाम थेट केसांवर दिसून येतो. केसगळती, अकाली पांढरे होणे आणि कोरडेपणामुळे केसांचे आरोग्य बिघडते. अनेक जण बाजारातील महागडी केमिकलयुक्त उत्पादने वापरतात, पण त्याचा परिणाम फारसा समाधानकारक दिसत नाही. मात्र, नैसर्गिक उपायांमध्ये एक अत्यंत प्रभावी घटक आहे, तो म्हणजे बाराही महिने आपल्या घरात असणारा कडीपत्ता!आयुर्वेदात कडीपत्त्याला केसांसाठी वरदान मानले गेले आहे. यामध्ये असलेले जीवनसत्त्वे, अँटीऑक्सिडंट्स आणि अमिनो ॲसिड केसांच्या वाढीस चालना देतात. नियमित वापर केल्यास केस गळती रोखली जाऊन केस घनदाट आणि लांबसडक होतात. चला, आता जाणून घेऊया कडीपत्त्याचा योग्य वापर आणि त्याचे अद्भुत फायदे!

## कडीपत्ता आणि नारळाचे तेल



कडीपत्ता आणि नारळाचे तेल यांचे मिश्रण हे केसांसाठी उत्तम औषध मानले जाते. नारळाच्या तेलात आवश्यक फॅटी ॲसिड आणि जीवनसत्त्वे असतात जे केसांना पोषण देतात आणि त्यांची मजबुती वाढवतात. हे टॉनिक तयार करण्यासाठी एका पॅनमध्ये नारळाचे तेल गरम करा आणि त्यात मुठभर ताजी कडीपत्त्याची पाने टाका. मिश्रण चांगले उकळू द्या आणि थंड झाल्यावर गाळून घ्या. हे तेल आठवड्यातून दोनदा केसांच्या मुळांमध्ये चोळा. यामुळे केस अधिक मजबूत आणि निरोगी होतात.

## कडीपत्ता आणि दही

कोरड्या आणि निर्जीव केसांसाठी कडीपत्ता आणि दह्याचा हेअर पॅक अत्यंत फायदेशीर आहे. दही नैसर्गिक कंडिशनरप्रमाणे काम करते आणि टाळू स्वच्छ ठेवते. कडीपत्त्याची पेस्ट तयार करून त्यात एक चमचा फेटलेले दही मिसळा. हे मिश्रण केसांना आणि टाळूला लावा, हलक्या हाताने मसाज करा आणि ३०-४० मिनिटांनंतर शॅम्पूने केस धुवा. हा उपाय केसांच्या वाढीस मदत करतो आणि टाळूवरील कोंड्याची समस्या दूर करतो.



## कडीपत्त्याच्या नियमित वापराने मिळणारे फायदे



कडीपत्त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे केसांची मुळे मजबूत करतात आणि त्यांची वाढ झपाट्याने होते. यातील पोषक घटक टाळू स्वच्छ ठेवतात आणि केसांच्या गळतीवर नियंत्रण ठेवतात. नियमित वापर केल्यास केस काळे आणि नैसर्गिक चमकदार राहतात. कडीपत्त्याच्या रसामुळे टाळूवरील मृत त्वचा दूर होते आणि कोंड्याची समस्या हळूहळू कमी होते. केस गुळगुळीत आणि सिल्की बनण्यासाठी कडीपत्त्याचा वापर अत्यंत उपयुक्त ठरतो.

---

# हे ५ पदार्थ भणकही लागू न देता हृदयाचे ठोके करतात कायमचे बंद, विषापेक्षाही भयंकर होतो शेवट, हार्ट अटॅकआधी सावधान


आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हृदयाचे आरोग्य बिघडण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. चुकीच्या आहाराच्या सवयी, शारीरिक हालचालींचा अभाव आणि मानसिक तणाव यामुळे हृदयविकाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः काही खाद्यपदार्थ हृदयासाठी अत्यंत हानिकारक ठरतात. त्यामुळे या पदार्थांचा आहारात कमीत कमी समावेश करण्याची किंवा त्यांना पूर्णपणे वर्ज्य करण्याची गरज आहे. आजच्या लेखात आपण जाणून घेणार आहोत की कोणते पदार्थ हृदयाच्या आरोग्यास हानी पोहोचवतात आणि त्यांचे सेवन टाळल्याने हृदयविकाराचा धोका कसा कमी होऊ शकतो.

## साखर



जास्त प्रमाणात साखर सेवन केल्याने शरीरातील ईन्सुलीनची पातळी असंतुलित होते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. शुगर प्रोसेस्ड फूडमध्ये मोठ्या प्रमाणात असते आणि त्यामुळे कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब वाढू शकतो. गोड पेय, पेस्ट्री, केक आणि मिठाई यांचा जास्त प्रमाणात वापर टाळावा.

## पांढरा तांदूळ




पांढऱ्या तांदळामध्ये फायबर आणि पोषणमूल्ये कमी असतात, ज्यामुळे तो लवकर पचतो आणि रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढवतो. यामुळे मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. म्हणून संपूर्ण धान्यांचा समावेश करणे अधिक उपयुक्त ठरते.

## मैद्याचे पदार्थ



रिफाइंड मैदा शरीरासाठी अत्यंत हानिकारक आहे. यामध्ये फायबरचा अभाव असल्यामुळे पचन क्रिया मंदावते आणि शरीरातील साखर पातळी वेगाने वाढते. ब्रेड, नूडल्स, पिझ्झा आणि बिस्किटे यामध्ये मैदा मोठ्या प्रमाणात असतो, त्यामुळे हे पदार्थ टाळणे हिताचे ठरेल.

## बटाटा



बटाट्यामध्ये स्टार्चचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते रक्तातील साखर वाढवण्यास कारणीभूत ठरू शकते. तळलेले बटाट्याचे पदार्थ, चिप्स आणि फ्रेंच फ्राईज यामुळे कोलेस्टेरॉलची पातळी वाढून हृदयविकाराचा धोका निर्माण होतो. त्याऐवजी गाजर, बीट आणि पालेभाज्यांचा समावेश करणे आरोग्यासाठी लाभदायक ठरेल.

## प्रक्रियायुक्त अन्न व जंक फूड

प्रक्रियायुक्त अन्नामध्ये जास्त प्रमाणात मीठ, साखर आणि ट्रान्स फॅट्स असतात, जे हृदयासाठी अत्यंत घातक ठरतात. रेडी-टू-ईट पदार्थ, कोल्ड ड्रिंक्स, पॅकेज्ड फूड आणि फास्ट फूड यामुळे हृदयावर ताण येतो आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. हृदय निरोगी ठेवण्यासाठी योग्य आहार अत्यंत महत्त्वाचा आहे. साखर, पांढरा तांदूळ, मैदा, बटाटा आणि प्रक्रियायुक्त अन्न यांचा अतिरेक टाळल्याने हृदयविकाराचा धोका कमी करता येतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवरायांपुढे अश्वानेही घातला मानाचा मुजरा..



जनसंचलन/ बुलढाणा

बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त शहरातील विविध ठिकाणी शिव जन्मोत्सव मोठा उत्साहात साजरा करण्यात आला देशातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर बुलढाणा शहरात बांधण्यात आलेले आहे या ठिकाणी अनेक शिवभक्त येऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत आहेत तर अशातच योगीराज नावाच्या अश्वानेदेखील या मंदिरासमोर येऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापुढे नतमस्तक झाल्याचं बघायला मिळाले

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा येथे शिवजयंती उत्साहात साजरी

जनसंचलन/बुलढाणा

नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा या संस्थेत दिनांक १९ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाच्या व्याख्यान कक्षामध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रथम वर्ष एमबीबीएस चे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी लेझीम नृत्य करत तसेच शिवरायांचा जयघोष करीत संपूर्ण परिसर शिवमय केला होता. त्यानंतर महाविद्यालयाच्या व्याख्यान कक्षात छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे पूजन दीप प्रज्वलन तसेच शिवरायांची आरती कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने यांच्या हस्ते करून करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राजू काटोले यांनी लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती या विषयावर विचार मांडले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी



छत्रपती शिवरायांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाचा कसा कोथळा बाहेर काढला याचा जिवंत देखावा पोवाड्याच्या माध्यमातून प्रथम वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांनी सादर केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने हे होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. झिने यांनी शिवचरित्रावर विचार मांडले तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवरायांचे विचार, दूरदृष्टी आत्मसात केल्यास कोणत्याही क्षेत्रात यश मिळवणे सोपे होईल असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली चावरे तसेच सौरभ जोशी यांनी केले.

यावेळी डॉ. सागर फाटे, डॉ. अर्चना टेकाळे, डॉ, स्वाती कांबळे, महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री सोमनाथ माठे, राहुल जाधव, प्रमोद भोपळे, गजानन भोरकडे, मनोहर सोनी, अविनाश हिवाळे यांच्यासह प्रथम वर्ष एमबीबीएस चे विद्यार्थी तसेच सर्व स्टाफ, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमबीबीएस प्रथम वर्ष विद्यार्थी अभिजीत नरोटे,श्रीओम धात्रक,आदित्य करपे, अर्जुन पळसकर, रीशील जांभुळकर, गजानन शिंदे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## बुलडाणा अर्बन संस्थेच्या तिरुपती येथील भक्तनिवास मध्ये शिवजयंतीच्या निमित्ताने प्रसाद वाटप

# शिवाजी महाराजांनी आपल्याला समतेचा संदेश दिला: राधेश्याम चांडक



जनसंचलन/बुलढाणा

हिंदवी संस्थापक स्वराज्याचे श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आंध्रप्रदेशातील तिरुपती भक्त निवास येथे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी राधेश्याम चांडक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ महाराष्ट्रातीलच नाही तर जगभरातील छत्रपती होते म्हणून आम्ही आहोत.छत्रपतींनी आम्हाला आत्माभिमान दिला, आत्म तेज दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्याला समतेचा संदेश दिला. १८ पगड जातींना एकत्रित करुन ज्या स्वराज्याची त्यांनी स्थापना केली त्या स्वराज्यातून एकतेचा संदेश त्यांनी आपल्याला दिला. राज्यकारभार कसा चालवला पाहिजे हे छत्रपती शिवाजी महाराज यांनी शिकवले वनसंवर्धन, जलसंवर्धन कसं केले पाहिजे हे शिवरायांनी शिकवले. करप्रणाली कशी असली पाहिजे, सुरक्षा, समुद्री सुरक्षा कशी ठेवली पाहिजे हे महाराजांनी शिकवले असे मोलाचे मार्गदर्शन राधेश्याम चांडक होते.या प्रसंगी बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, सी.ए. सचिन वैद्य, अनंत देशपांडे तसेच शाखा व्यवस्थापक, इतर कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित.




# श्रींच्या प्रगटदिनी प्रगटले त्रिदेव!

जनसंचलन/बुलढाणा



श्रींच्या प्रगट दिनानिमित्ताने का होईना, बुलढाणा जिल्ह्यातील कधी न एकत्र दिसणारे राजकारणी आज महाप्रसाद वाटपासाठी एकत्रित दिसून आले. त्यांच्या चेहऱ्यावरील श्रद्धाभाव अनेकांना यावेळी भावला.त्यामुळे श्रींच्या प्रगटदिनी त्रिदेव! प्रकटल्याचे यावेळी बोलल्या जात होते.आमदार संजय गायकवाड यांचे विरोधी म्हणून माजी आमदार विजयराज शिंदे अनेकांना परिचित आहेत.शिवाय शेतकरी नेते रविकांत तुपकर हे देखील गायकवाड यांचे राजकीय विरोधी समजले जातात. हे तिन्ही नेते सहसा एकत्रित दिसून येत नाहीत.परंतु आज येळगाव येथे प्रकट दिनाच्या निमित्ताने आमदार संजय गायकवाड यांच्याहस्ते पूजन तसेच महाआरती संपन्न झाली. परमपूज्य ह.भ.प श्री हरी चैतन्यानंदजी महाराज यांचे गायकवाड यांनी मनोभावे दर्शन घेतले!दरम्यान महाप्रसादाला सुरुवात झाली असताना,आमदार संजय गायकवाड यांच्यासोबत माजी आमदार विजयराज शिंदे,शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी एकत्रितपणे भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले.

# बनावट नोटा प्रकरण, मुंबईत एकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

जनसंचलन/मेहकर

दोन महिन्यापूर्वी कथितरित्या पोलिसांनी बनावट नोटा प्रकरणात कारवाई न केल्याच्या विरोधात मेहकरमधील यशवंत सेनेचे जिल्हा संघटक गजानन बोरकर यांनी मुंबई मंत्रालयासमोर ज्वालाग्राही द्रावण अंगावर घेत गुरुवारी आत्मदहनाचा प्रयत्न केला, परंतू पोलिसांनी वेळीच त्यांना रोखल्याने अनर्थ टळला. सध्या बोरकर यांना मुंबईतील नरिमन पॉईंट पोलिस चौकीत पोलिसांनी चौकशीसाठी नेले आहे. मेहकर पोलीस ठाण्यातर्गत लोणार तालुक्यात येत असलेल्या ग्रामीण भागात मध्यंतरी मेहकर पोलिसांनी कथितरित्या बनावट नोटा प्रकरणात चार जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. परंतू या प्रकरणात कथितरित्या गैरप्रकार झाला असून कारवाई करण्याची मागणी गजानन बोरकर यांनी केली होती. पोलिसांनी त्यासंदर्भाने आश्वासनही दिले होते, परंतू त्याउपरही कारवाई होत नसल्याने तथा प्रकरणात हस्तक्षेप करणाऱ्या स्थानिक पोलिसांनाही जिल्हा पोलिस प्रशासन पाठीशी घालत असल्याचा संशय बोरकर यांना होता. त्यामुळे त्यांनी २० फेब्रुवारी रोजी मुंबई मंत्रालयासमोर ज्वालाग्राही द्रावण अंगावर घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला, परंतू पोलिसांनी त्यांना वेळीच रोखल्याने अनर्थ टळला. दरम्यान या प्रकरणात वरिष्ठांचे मार्गदर्शन मेहकर पोलिसांनी घेतले होते. त्यानुसार पोलिसांनी प्रकरणात गुन्हा दाखल केला नव्हता, असे सांगण्यात येत आहे.

# कथाच्या वाढदिवसाची गोड कहाणी!

## मूकबधिर अंध अपंगांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य!




जनसंचलन/बुलढाणा

गुलाबाच्या ओठी आली घेऊन ती गोड चैतन्याची गाणी.. जसं पहाटेचं पडलेलं स्वप्न जशी परीची कहाणी!.. कथा यश कायस्थ या चिमुकल्या राजकन्येचा आज पहिला वाढदिवस ! तिच्या या वाढदिवसाला सामाजिकतेची किनार लाभलेली.. वाढदिवसाच्या पूर्व दिवशी म्हणजे श्रींच्या प्रगट दिनानिमित्त बुलढाणा येथील मूकबधिर अंध अपंग विद्यालयात चिमुकल्यांना बिस्किट वाटप करण्यात आले. शहरातील सुखवस्तू कुटुंबात राहणाऱ्यांना वाढदिवस म्हटले की,जंगी पार्टी करावीशी वाटते.. पण गरिबांचे काय ? मूकबधिर अंध अपंगांचे काय? त्यांचे प्रश्न समजून कोण घेते?हेच सामाजिक भान जपण्याबरोबरच इतरांमध्ये जाणीव निर्माण व्हावी यासाठी कायस्थ परिवाराच्यावतीने शहरातील मूकबधिर अंध अपंग विद्यालयात असलेल्या चिमुकल्यांना बिस्किट वाटपाचा उपक्रम काल राबविण्यात आला.श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाचा योग आल्याने हा कार्यक्रम अधिकच गोड झाला.कथा यश कायस्थ या राजकन्येचा आज पहिला वाढदिवस असून, तिच्या या वाढदिवसाला सामाजिकतेची जोड लाभल्याने तिला अनेकांचे शुभाशीर्वाद निश्चितच लाभणार आहेत.

# घरफोडीत १३.५४ लाखांचा मुद्देमाल लंपास

जनसंचलन/मेहकर

शहरातील शिवाजी नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून १३ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना १९ फेब्रुवारी रोजी समोर आली आहे. घरमालक बाहेरगावी असताना ही चोरी घडली. या प्रकरणी ऋषिकेश नंदकिशोर रहाटे (२७) यांच्या तक्रारीवरून मेहकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रहाटे १८ फेब्रुवारी रोजी कामानिमित्त घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाज्याचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी बेडरुममधील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने (१३.४५ लाख रुपये) आणि रोख ९ हजार रुपये असा एकूण १३.५४ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला. तक्रारीच्या आधारे मेहकर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास ठाणेदारांच्या मार्गदर्शनासाठी सुरू आहे.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958